**चिपळूण नगर परिषद**

निविदा सुचना

(बांधकाम विभाग/योजना)

चिपळूण नगर परिषद खालील कामांसाठी बी-१ टक्केवारी पध्दतीने व दोन लखोटा पध्दतीने सीलबंद निविदा योग्य वर्गातील महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम डीडी अथवा मुदत ठेव स्वरूपात | सुरक्षा अनामत | | ठेकेदाराचा वर्ग | कामाची मुदत | निविदा फॉर्मची किंमत (ना-परतावा) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | करारनामा सोबत | बीलातून | | | |
| १ | मिलिंद कांबळे घर ते मुख्यरस्त्यापर्यत आर सी सी गटार बांधणे | २५९०९१ | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ७५ दिवस | ५०० |
| २ | गौरेश अपार्टमेंटच्या मागील बाजूस सीसी रिर्टेनिंग वॉल बांधणे | ३६५०७२ | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ९० दिवस | ५०० |
| ३ | वाणीआळी येथील गुढेकर घर ते शिरगांवकर घर ते रेडीज घरापर्येत आरसीसी गटार बांधणे | १०१४२० | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ७५ दिवस | ५०० |
| ४ | बापटआळी येथे हॉटेल अपूर्व ते आगवेकर घरापर्यत पेवींग ब्लॉक पाखाडी बांधणे | १६७७५५ | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ७५ दिवस | ५०० |
| ५ | गौतमेश्वर गल्ली येथे रस्त्यास भराव करणे व डांबरीकरण करणे | २३९४०२ | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ७५ दिवस | ५०० |
| ६ | म्यु.पल मुख्यरस्ता ते सिध्दी अविन्यु बिल्डींग पर्यंत पाखाडी,गटार व स्लॅब मोरी बांधणे | २५२३३२ | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ७५ दिवस | ५०० |
| ७ | जाबरे घर ते बडदे घरापर्यत संरक्षक भिंत बांधणे | २५६२३५ | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ७५ दिवस | ५०० |
| ८ | श्री.शिंदे घर ते श्री.वरवाटकर घरापर्यंत प-हया बांधणे व त्यावर स्लॅब टाकणे | ३०२६७० | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ९० दिवस | ५०० |
| ९ | स्नेहल जनरल स्टोअर्स समोरील पाखाडीवर पेविंग ब्लॉक बसविणे | १३०००५ | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ७५ दिवस | ५०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | पेठमाप येथील एन्रॉन ब्रिज जवळ धोबी घाट बांधणे | ९४३९० | २००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ६० दिवस | १०० |
| ११ | पेठमाप शिंदे घर ते रडीज घरापर्यंत गटार बांधणे | ११६७२८ | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ६० दिवस | ५०० |
| १२ | प्रभाकर सुर्वे घर ते पाली रस्त्याचे डांबरीकरण करणे व गटार बांधणे | ३५२३६० | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ९० दिवस | ५०० |
| १३ | बाजारपेठ येथील मारुती मंदिर ते डॉ.सरगुरु दखाखान्यापर्यंत पेविंग ब्लॉक पाखाडी व गटार बांधणे | १८७७०७ | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ६० दिवस | ५०० |
| १४ | नगराध्यक्ष यांचे चेंबरची दुरुस्ती करणे | ३४८८२४ | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ९० दिवस | ५०० |
| १५ | नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांचे पॅसेज मुतारीची दुरुस्ती करणे | २५६८६४ | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ७५ दिवस | ५०० |
| १६ | वॉ.क्र.७ मधील मुलींच्या शाळेजवळील बालोदयानाचे सुशोभिकरण करणे | ६७५२०० | १०००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-८ व त्यावरील | ९० दिवस | १००० |
| १७ | वॉ.क्र.७ मधील बालोदयानाच्या कंपाऊंड वॉलला रंगकाम करुन तेथे स्टील गेट बांधणे | १०००२४ | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ७५ दिवस | ५०० |
| १८ | डॉ.शारंगपाणी घरापासून ते देवधर घरापर्यंत पेविंग ब्लॅक पाखाडी बांधणे | ३६९९५८ | ५००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग-९ व त्यावरील | ७५ दिवस | ५०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | चिपळूण नगर परिषदेचे आरक्षण क्र.५९ दुकाने व व्यायमशाळा या इमारतीमधील १ ते ८ या गाळयाचे लोखंडी शेटर्स बसविणे | ७३००० | २००० | ३ टक्के | ७ टक्के | वर्ग- ९ व त्यावरील | ३० दिवस | १०० |

१. निविदा फॉर्म मिळण्याची शेवटची तारीख ०६/०५/११ पर्यंत म्यु.पल एक खिडकी विभागात सायं. ५.०० पर्यंत मिळतील.

२ निविदा सादर करण्याची अंतीम तारीख ०९/०५/११ वेळ दुपारी २.०० वाजेपर्यंत प्रशासकिय अधिकारी, चिपळूण नगर परिषद यांचे कक्षामध्ये ठेवलेल्या टेंडर पेटीमध्ये टाकावयाची आहे.

३ निविदा उघडण्याची अंतीम तारीख ०९/०५/११ वेळ सायंकाळी ४.३० वाजता चिपळूण नगर परिषद कार्यालयामध्ये उपस्थित ठेकेदार यांचे समक्ष उघडणेत येतील. उशीरा आलेल्या पोष्टाने/कुरीयरने आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. कामासंबधी नकाशे अंदाजपत्रक व माहिती नगर परिषद बांधकाम विभागात पहावयास मिळेल. सविस्तर निविदा सुचना नगरपरिषदेच्या अभिलेख व भांडार विभागात मागणी केल्यास विनामुल्य उपलब्ध आहेत. किंवा नगरपरिषद नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल. कोणतेही सर्व अथवा एक निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचे अंतिम अधिकार मुख्याधिकारी, चिपळूण नगर परिषद यांजकडे राखून ठेवणेत येत आहेत.

निविदा सुचना क्रमांक २०११०४०७
दिनांक :२६/०४/२०११

**मुख्याधिकारी** **अध्यक्ष**
**चिपळूण नगर परिषद**

टीप : सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेचे **www.cmcchiplun.org** या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

# सविस्तर निविदा सुचना

१. बयाणा रक्कम डी.डी. किंवा मुदत ठेव किमान १ वर्षे मुदतीची स्विकारली जाईल. रोखीने स्विकारली जाणार नाही.
२. निविदा फॉर्म लेखा विभागात आवश्यकती रक्कम रोख भरल्यानंतर न.पा.च्या अभिलेख व भांडार विभागातून उपलब्ध होतील.
३. यशस्वी ठेकेदार यांनी करारनाम्यासोबत अनामत रक्कम भरली नाही अथवा करारनामा विहीत मुदतीत केला नाही तर भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. करारनामा पूर्ण झाल्यावर यशस्वी ठेकेदारांची बयाणा रक्कम सुरक्षा अनामत म्हणून वर्ग होईल.
४. निविदा स्विकृतीचे पत्र मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत करारनामा व करारनाम्यासोबत भरावयाची सुरक्षा अनामत न भरल्यास बयाणा रक्कम जप्त होईल. निविदा उघडल्यापासून १२० दिवसांत नगर परिषदेने काहीही न कळविल्यास निविदा धारकाला निविदा मागे घेता येईल व अशा वेळी बयाणा रक्कम परत मिळेल. निविदा दिनांकापासून १२० दिवसापर्यंत वैध राहील.
५. अयशस्वी निविदा धारकांना निविदा नामंजूर झाल्याचे कळविल्यानंतर किंवा १२० दिवसांनंतर अर्ज केल्यानंतर अर्ज केल्यावर बयाणा रक्कम परत देण्यात येईल.
६. निविदा स्विकृतीबाबत ठेकेदार यांना पत्राने कळविण्यात येईल.
७. निविदा धारकांनी पान क्रमांक ४ वर कामाची निविदा या ठिकाणी टक्केवारीने कमी/जादा लिहून व अक्षरी लिहून सही करणे आवश्यक आहे. अक्षरी व अंकी यामध्ये फरक आढळल्यास दोन्हीमधील सर्वात कमी दर स्विकृत करण्यात येईल.
८. निविदेमध्ये कोणतेही पान वाढविता अथवा कमी करता येणार नाही.
९. निविदा सादर करण्याची पध्दत

९.१ निविदा दोन स्वतंत्र लखोट्यात सिलबंद सादर करणे आवश्यक आहे.

९.२ निविदा लखोटा क्र.१ मध्ये बयाणा रक्कमेचे डी.डी/मुदत ठेव पावती, तांत्रिक व आर्थिक क्षमता सिध्द करणारे कागदपत्र आवश्यक आहेत. डांबरीकरण केलेल्या कामाचे अनुभवाचे दाखले या कागदपत्रांची यादी व सर्व कागदपत्रसत्यप्रती (साक्षांकित) करणे आवश्यक आहे. निविदेसोबत कोणत्याही अटी शर्ती टाकावयाच्याअसल्यास लखोटा क्र.१ मध्ये ठेवणे आवश्यक आहे.

९.३ ठेकेदार यांचे योग्य वर्गातील नोंदणीपत्र सत्यप्रती (साक्षांकित) केलेले व स्वच्छ दिसणारे आवश्यक आहे.

९.४ वरील कामासाठी ठेकेदाराने हॉटमिक्स डांबरीकरणाच्या कामासाठी आवश्यक असणारा हॉटमिक्सचा प्लॉट पेव्हर फिनीशर मशिनरी, इत्यादी स्वतःचे मालकीचे असल्याचे अथवा भाडयाने घेतले असल्यास त्यासंबंधीचे कागदपत्र असावा. यासंबधी माहिती स्वतःच्या सहीने लखोटा क्र.१ मध्ये असणे आवश्यक आहे.

९.५ कुशल व तांत्रिक कर्मचारी यांची यादी लखोटा नंबर १ मध्ये स्वतःच्या सहीने ठेवणे आवश्यक आहे.

९.६ भागीदारी फर्म असल्यास भागीदारी पत्राची सत्यप्रती लिपी व अधिकार पत्र जोडणे आवश्यक आहे.

९.७ दोन्ही लखोट्यावर कामाचे नाव ठेकेदाराचे नांव लिहून दोन्ही लखोटे सिलबंद करून लखोटा क्रमांक ३ मध्ये सिलबंद करुन सादर करणे आवश्यक आहे.

९.८आयकर पॅनकार्डच्या सत्यप्रती लिपी व वॅट रजिस्ट्रेशनचा दाखल्याची सत्यप्रत लिपी सोबत जोडणे आवश्यक आहे.

१०. निविदा उघडणे

१०.१ निविदा उघडणेसाठी नेमलेल्या दिवशी प्रथम लखोटा क्रमांक १ उपस्थित ठेकेदारासमोर उघडणेत येईल. व त्यामध्ये कागदपत्रांची छाननी मुख्याधिकारी किंवा मुख्याधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी करतील. व उपस्थित ठेकेदार यांचे आक्षेप यासंबधी खात्री करतील.

१०.२ दुसरे दराचा सिलबंद लखाटा लखोटा क्र.१ मधील कागदपत्रे योग्य असल्याबद्दल मुख्याधिकारी अथवा मुख्याधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांची खात्री पटल्यानंतरच उघडण्यात येईल.

१०.३ निविदा लखोटा क्र. १ मधील कागदपत्रे अपूर्ण अथवा अयोग्य असल्यास लखोटा क्र. २ उघडण्यात येणार नाही. व तो निविदा धारकांला परत मिळणार नाही.

१०.४ निविदा धारकांने निविदेच्या संपूर्ण अटी व शर्ती वाचल्या असल्याबद्दल व त्या मान्य असल्याबद्दल प्रत्येक पानावर सही करणे आवश्यक आहे. तसेच कामाचे नकाशे अंदाजपत्रक पाहिले असलेबद्दल निविदेतील प्रतिज्ञापत्रावर सही करणे आवश्यक आहे.

१०.५ कामाचे बाबतीत किंवा कागदपत्राचे बाबतीत कोणताही बदल आवश्यक असल्यास त्याबाबत निविदा फॉर्म खरेदी करणारे ठेकेदार यांना पत्राने तसेच वर्तमान पत्रात त्याबाबत आवश्यक ती शुध्दीपत्रक निविदा सादर करण्याच्या दिवसापूर्वी प्रसिध्द करणेत येईल.

१०.६ निविदेसंबधी कोणतेही मुद्दे उपस्थित करावयाचे असल्यास ते निविदेसोबत लखोटा क्र. १ मध्ये देणे आवश्यक आहे. मुख्याधिकारी यांचेवर कोणत्याही अटीची निविदा किंवा बेकायदेशिर अटी स्विकृत करण्याचे बंधन नाही.

११. यशस्वी निविदा धारकांना निविदा मंजूरीनंतर योग्य रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देणे आवश्यक आहे.
१२. मंजूर निविदा धारकांना निविदा मंजूरीबाबत कळविल्यापासून १० दिवसांचे आंत करारनामा व करारनाम्यासोबत भरावयाची सुरक्षा अनामत रोखीने अथवा मुदत ठेवीने न भरल्यास निविदा अमान्य करून फेर निविदा अथवा अन्य निविदाधारकांची

निविदा स्विकृत करावी लागल्यास फरकाची रक्कम संबधीत ठेकेदाराकडून महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५१ अन्वये वसुल पात्र असेल.

१३. कोणतेही अथवा सर्व निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे. त्याबाबत कोणतेही कारणे देण्यात येणार नाहीत.

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद